

।। विद्याच् एवम् सर्व सिध्दी ।।

PK Foundation

Mission of Pratap Khandebharad

# पी. के. इंटरनॅशनल स्कूल कडाचीवाडी, चाकण

## म्हणजे विद्यार्थ्यांसाठी आनंददायी शिक्षण आणि समृद्ध जीवनमूल्यांची सांगड घालणारी शाळा

**"पुस्तकातील ज्ञानाची प्रत्यक्ष जीवनात अंमलबजावणी करता आली, तरच ते खरे शिक्षण" ही विचारधारा घेऊन पी. के. फाउंडेशन संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष मा. श्री. प्रतापराव खांडेभराड यांनी संस्थेची स्थापना केली.**

**शिक्षण केवळ चार भिंतीत मर्यादित राहू नये किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या क्रमिक पुस्तकांच्या चौकटीत अडकू नये, तर ते विद्यार्थ्यांच्या बुद्धीच्या विविध पैलूंना चालना देणारे आणि त्यांना समाजाशी अधिकाधिक जोडणारे व्हावे, या दृष्टिकोनातून पी. के. फाउंडेशन, कडाचीवाडी (चाकण) ही संस्था गेल्या एक दशकाहून अधिक काळ सातत्याने प्रयत्नशील आहे.**

### आर्ट इंटिग्रेटेड आणि एक्सप्रेशन लर्निंग : शिक्षणाची सर्जनशील वाटचाल

- PKIS मध्ये विद्यार्थ्यांसाठी आर्ट इंटिग्रेटेड लर्निंग आणि एक्सप्रेशन लर्निंग यावर विशेष भर दिला जातो. विविध विषयांसोबत कला, संगीत, नृत्य, चित्रकला आणि थिएटर यांचा समावेश करून विद्यार्थ्यांना अधिक सर्जनशील आणि उत्स्फूर्त बनवले जाते.
- **विद्यार्थी विविध माध्यमांचा वापर करून आपले विचार आणि कल्पना व्यक्त करतात. उदाहरणार्थ**
- चित्रकला आणि हस्तकलेच्या साहाय्याने विज्ञानातील संकल्पना उलगडणे. थिएटर परफॉर्मन्सद्वारे ऐतिहासिक घटनांचे सादरीकरण.
- संगीत व नृत्याच्या साहाय्याने गणित व सांस्कृतिक परंपरांची शिकवण अधिक आनंददायी करणे.
- एक्सप्रेशन लर्निंग विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देत नाही, तर त्यांना स्वतःच्या विचारांची मांडणी करण्याची कला शिकवते. अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि सहकार्याची भावना विकसित होते.
- 'कला आणि शिक्षण यांचा संगम म्हणजे संपूर्ण विकासाची गुरुकिल्ली,' अशा दृष्टिकोनातून आम्ही विद्यार्थ्यांसाठी हा सर्जनशील प्रवास घडवतो.

### संस्कार आणि संस्कृती जपणारे शिक्षण : परंपरा नव्या दृष्टिकोनातून

- P K International School मध्ये शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नसून, संस्कार, परंपरा आणि आधुनिकतेचा संगम आहे. याच दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीचे महत्त्व समजावून देण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जातात.
- विद्यार्थ्यांकडून गाईची पूजा करून वसुबारस साजरी केली जाते. यामध्ये पर्यावरणपूरक जीवनशैली आणि आयुर्वेदिक औषधांचे महत्त्व समजावले जाते. शाळेच्या आवारात आयुर्वेदिक झाडे लावण्याचा उपक्रम राबवला जातो, जो विद्यार्थ्यांना निसर्गाशी नाते जोडण्याचा एक अभिनव प्रयत्न म्हणून घडतो.
- घरोघरी शिवजयंती उपक्रम आणि वाडी-वस्तीवर शिवजागर कार्यक्रमातून विद्यार्थ्यांद्वारे महाराजांच्या शौर्यगाथा, पराक्रम आणि लोकशाही विचारधारा समाजापर्यंत पोहोचवली जाते. यासोबतच, संत मालिका सेलिब्रेशनच्या माध्यमातून संतांचे विचार, शिकवणी, आणि जीवनमूल्यांवर आधारित कार्यक्रम सादर केले जातात, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनामध्ये आध्यात्मिक विचारांची बीजे रोवली जातात.
- PKIS विद्यार्थ्यांसाठी केवळ शिक्षण केंद्र नसून, परंपरा आणि आधुनिकतेच्या एका सुंदर प्रवासाला घेऊन जाणारी प्रेरणास्थळ बनले आहे. *संस्कारांचे बीज रोवू, सशक्त भारताचे स्वप्न सजवू.
- ज्ञानाचा प्रवास, अनुभवाचा ठेवा!* PKIS मध्ये विद्यार्थ्यांना केवळ वर्गातच नाही, तर प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण मिळावे यावर भर दिला जातो. शैक्षणिक सहली आणि फील्ड व्हिजिट्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऐतिहासिक स्थळे, विविध राज्यांतील खाद्यसंस्कृती, परंपरा आणि ऐतिहासिक वारसा समजून घेण्याची संधी दिली जाते.
- विद्यार्थ्यांना छोट्या-मोठ्या ज्ञानवर्धक कंपन्यांचे दौरे घडवून उत्पादन प्रक्रिया आणि व्यवस्थापनाचे महत्त्व समजावले जाते. याशिवाय, राज्याबाहेरील विविध ठिकाणी जाऊन स्थानिक संस्कृती, भौगोलिक वैशिष्ट्ये आणि ऐतिहासिक स्थळांच्या भेटींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण अधिक व्यापक बनवले जाते.
- या उपक्रमांनी विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडतेच, पण त्यांच्यात निरीक्षण कौशल्य, उत्सुकता आणि स्वावलंबन यांसारख्या गुणांचाही विकास होतो.
















### क्रीडा शिक्षणातील नावीन्यपूर्ण प्रयोग

- PKIS मध्ये क्रीडा शिक्षणाला नवा आयाम देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना शिस्तीचे धडे मिळावेत यासाठी *ड्रिल, मार्च पास, सेल्फ डिफेन्स, रोप क्लायम्बिंग, आर्चरी, रायफल शूटिंग, हॉर्स रायडिंग* यांसारख्या आधुनिक खेळांचे प्रशिक्षण उपलब्ध आहे. त्याचसोबत *कबड्डी, खो-खो, हॉकी आणि फुटबॉल* यांसारख्या पारंपरिक खेळांचे प्रशिक्षण देखील विद्यार्थ्यांना दिले जाते. या संपूर्ण क्रीडा प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य, आत्मविश्वास आणि मानसिक व शारीरिक क्षमतांचा विकास होतो.
- याच प्रशिक्षणाचा सकारात्मक परिणाम म्हणून 2024-25 वर्षी शासकीय क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी अपूर्व यश संपादन केले आहे, ज्यामुळे शाळेचा गौरव वाढला आहे.

**P K I S च्या विद्यार्थ्यांनी क्रीडाक्षेत्रात गाठली नवी शिखरे. विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक वर्षात विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्तम कामगिरी केली आहे. खालील विद्यार्थ्यांनी जिल्हा क्रीडा स्पर्धा (DSO) 2024-25 मध्ये क्रीडा संकुल, राजगुरुनगर येथे आपली अद्वितीय कामगिरी दर्शवली.**

- **कार्तिक नवनाथ शेवकरी :** 5 किलोमीटर वॉकिंग स्पर्धेत दुसरे स्थान पटकावले.
- **शौर्य बाबराव जोंधळे :** याने 400 मीटर धावण्यात तिसरे स्थान पटकावले.
- **आरती राजू इंगळे आणि ज्ञानेश्वरी देवदास नेहरे :** हॅमर थ्रो इव्हेंटमध्ये दुसरे व तिसरे स्थान मिळवले.
- **सुयोग जयेश पठारे, आर्य बाबराव जोंधळे, शौर्य बाबराव जोंधळे, अरमान इक्बाल शेख** : 4x400 रिलेमध्ये दुसरे स्थान आणि 4x100 रिलेमध्ये तिसरे स्थान मिळवले.
- **शंतनू किशोर देवकर :** क्रॉस कंट्री रनिंगमध्ये तिसरे स्थान मिळवले.
- **आलोक विक्रम गोरे :** किक बॉक्सिंग (47 किलो वजनगटात) मध्ये दुसरे स्थान मिळवले.

या विद्यार्थ्यांनी शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. संस्थेला त्यांच्या या यशाचा अभिमान असून त्यांना भावी यशासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

शेवटी स्व-विकास आणि समाजविकास हे एकमेकांच्या हातात हात घालून चालणारे घटक आहेत. संस्थेने त्यासाठी अनुभव शिक्षणावर नेहमीच भर दिलेला आहे. संस्था प्रतिनिधी इंजिनिअर निकिताताई खांडेभराड यांच्या नेतृत्वातून व संस्थेच्या सेक्रेटरी नंदाताई खांडेभराड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संस्थेचे अध्यक्ष मा. प्रतापराव खांडेभराड यांच्या दूरदर्शी विचाराने गेल्या एक दशकाहून अधिक कालखंडात पी. के. इंटरनॅशनल स्कूल विद्यार्थ्यांना उत्तम संस्कार, शिस्त, नेतृत्व विकासाच्या संधी आणि शिक्षण देऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधत आहे.




